


गोष्ट क्र. १४
४ एप्रिल २०२१

सुचेत
भगत-चिटगोपेकर
(१९७७-१९८३)



बरेचदा असं होतं की प्रबोधिनीचे विद्यार्थी हुशार असतात, त्यांच्यासमोर इतक्या वाटा खुल्या असतात, त्यामुळे त्यांच्या मनात हा प्रश्न येऊ शकतो, की प्रबोधिनी का दुसरं काही. त्यांना मला हे जरूर सांगायला आवडेल, की या कामाचा रंगच इतका सुंदर आहे, हे अस्सल केशर आहे, याने तुमचेच हात रंगून जातात.

ही कास जर सुटली तर मजा येत नाही. तुमच्यात जे तेज असतं, पुरुषार्थ असतो, तो सगळा प्रबोधिनीचा असतो. हे सगळं तुमच्यात इतकं मुरलेलं असतं की प्रबोधिनी तुमच्यातून काढून टाकायचा विचारही तुम्ही करू शकत नाही.

**कल्पवृक्ष कन्येसाठी ..**



इ. ८ वी ते ११वी अशा किशोर वयात मला आप्पांचा सहवास मिळाला म्हणून मी स्वतःला खूप भाग्यवान समजते. माझं ८वी पर्यंत प्रबोधिनीशी फार सख्य होतं असं नाही, त्यावेळी शाळेमध्ये एक भांडार होतं, तिथे शाळा सुरू व्हायच्या आधी काही दिवस पाठयपुस्तकं मिळायची. तेव्हा मी आणि अर्चना, त्या भांडारात नववीची पुस्तकं आली आहेत का ही चौकशी करायला शाळेत गेलो होतो. मे महिनाभर आंबे हादडून झाल्यावर आपलं उगाच भरतं आलं होतं की आपण सुट्टीतच अभ्यासाचा श्रीगणेशा करू वगैरे, वगैरे. तो उत्साह बहुधा जून महिन्याच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यातच पार विरून जात असे.

नेमके त्याच वेळी युवतींच्या निवासी अभ्यास शिबिराची तयारी चालू होती. सरिताताई आमचे दल घेत असे, तिने माझे नाव नोंदवून घेतले. त्या शिबिरात माझी आप्पांशी खूप जवळून ओळख झाली. आधी विद्यार्थिनी आणि नंतर कार्यकर्ती म्हणून मला आप्पांचा मार्गदर्शक सहवास लाभला. त्या शिबिरात प्रत्येकालाच कोणत्यातरी विषयाचा अभ्यास करून बोलायला सांगितलं होतं. तेव्हा मी पु. ना. ओकांच्या हिंदू विश्वराष्ट्राचा इतिहास या पुस्तकावर, प्रबोधिनीच्या स्टाईलने ढोर मेहेनत करून, अभ्यास करून भलेमोठे भाषण ठोकले होते. तेव्हाच मला कळलं की आप्पांना आपले भाषण आवडलं आहे. तिथून पुढे आमची गट्टी जमली. त्यावेळी सगळ्या कार्यकर्त्यांमध्ये खरतर मी खूप लहान होते, युवती विभागातील तायांचं शेपूट धरून मी युवती विभागात रुजत गेले होते. त्या काळापासून ते आप्पा असेतो मला त्यांचा भरभरून सहवास लाभला. आप्पांनीं मोठ्या खुबीने माझ्या मनात संघटनेचे बीज रोवले.

शाळेत आम्ही मस्त धमाल केली. मा. अशोकरावांनी मी पाचवीत असतानाच माझ्या प्रतिभेवर शिक्कामोर्तब केले त्यामुळे या शाळेत अभ्यास नाही केला तरी चालेल अशी सोयीची समजूत मी करून घेतली. वर्गातल्या बहुतांश मुलींशी अजूनही घट्ट दोस्ती आहे. मी युवती विभागात काम करत असताना कितीतरी तास माझ्या वर्गातल्या वंदना, शुभांगी आणि स्मिता सिनेमाची तिकिटे काढून माझी बैठक संपेतो ताटकळत थांबल्या आहेत. शाळेतल्या प्रत्येक शिक्षकांनी माझ्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला आहे.

**पंजाब यात्रा ..**



पुढे ९वीत असताना आम्ही पंजाबच्या दौऱ्याला गेलो होतो. आप्पा इतर सर्वांना देत असत तशीच सन्मानार्थ संबोधन वापरत असत, घरकुलातल्या बैठकीत एका टोकाला नलूताईंपासून सुरू करून, नलूताई तुम्ही जा पंजाबला, सुहासिनीताई तुम्ही जा, करत-करत शेवटी माझ्याकडे बघून सुचेत तुम्हीसुद्धा जा पंजाबला असं म्हणाणारे आप्पा अजूनही स्पष्ट आठवतात. वेदनेने पिळवटणारा देह आणि तरीही पंजाबचा धोशा लावणारा त्यांचा अट्टाहास याचा आजही माझ्यावर खूप मोठा पगडा आहे. मूर्तिमंत देशभक्त असणाऱ्या आप्पांनी मला प्रबोधिनीकडे खेचून आणलं होतं.

पंजाबच्या दौऱ्यात जीवावर बेतणाऱ्या घटना घडल्या. पंजाबची धमाल म्हणजे मी नलूताईंना नलूमावशी अशा प्रेमळ नावाने हाक मारायला सुरुवात केली होती. युवती प्रशाला परिवारात ही एक सांस्कृतिक क्रांती होती. आजीने तेव्हा माझ्या गळ्यात रुद्राक्ष असलेला गंडा बांधलेला होता. भिंद्रनवालेदादांनी मला तो उतरवायला सांगितला. सात्विक संतापाने मीही त्यांना म्हणाले, तुम्ही तुमचे क्रिपाण काढून टाका, मग मी माझा गंडा काढते हे बोलताना माझा छान वरच्या टिपेचा सूर लागला होता. ही आठवण सुहासिनीताई माझ्या मुलांना अजूनही रंगवून सांगतात. हे सगळं आप्पांना सांगायचं माझ्या मनात होतं. पण आम्ही पंजाबवरून येईस्तोवर त्यांची प्रकृती खूपच खराब झालेली होती.

**माझा भविष्यलेख ..**

जेव्हा ११वीत मी माझं स्वतंत्र दल सुरू केलं तेव्हा मी माझं पहिलं वृत्त आप्पांना दिलं होतं. या गोष्टीचा मला आजही आनंद वाटतो. त्या वृत्ताच्या अभिप्रायार्थ त्यांनी लिहिलं होतं -

मनोजवं मारुततुल्य वेगं, जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ।

या चार ओळींतून त्यांनी मला एक वसा दिला होता. माझ्या ग्रहणशील वयात आमच्यात प्रत्यक्ष आणि निःशब्द असा खूप संवाद झाला होता, पण अखेर मी ११वीत असताना ते गेले.

आजपर्यंत त्यांनी लिहून दिलेल्या ओळींचं बोट धरून मी माझ्या आयुष्याची वाटचाल केलेली आहे. त्यांच्या प्रत्येक भाषणाला, मी उपस्थित राहायचा प्रयत्न करायचे. मी लहान असल्यामुळे माझे एकूणच खूप लाड व्हायचे आणि कौतुकही व्हायचं. त्यांनी ये हृदयी चं ते हृदयी असं खूप काही घालून दिलं. त्या शिदोरीने मी समृद्ध आहे. माझ्या रोजच्या व्यावसायीक कामांमध्ये ही शिदोरी कामी येते. आजही आप्पांची एक-एक सूत्रं आठवून-आठवून, मी आवर्जून अंमलात आणत असते, आणि त्याच्यामुळेच माझ्या व्यवसायात मला टिकून राहता आले आहे आणि यशस्वी होता आले आहे.

उदाहरणार्थ, आप्पा असं सांगायचे, की एक पत्र असं लिहा की त्या पत्राद्वारे वाचणाऱ्याला जिंकता आला पाहिजे. हे सूत्र मी ईमेल लिहताना अनेकवेळा वापरलेले आहे. हळूहळू माझी युवती विभागात तायांशी मैत्री झाली त्या सगळ्या जवळ-जवळ दिवसभर तिथेच असायच्या. त्यांच्या मागे-मागे मला सगळीकडेच प्रवेश मिळायचा. त्यांच्यामुळे मला आप्पा मिळाले, आणि मला संघटनेचा शुभ संस्कार देऊन ते गेले. ते गेले तेव्हा असं वाटलं की त्यांनी आपल्याला हा वसा दिला आहे. माझ्या प्रबोधिनीतल्या कामाला, तसेच माझ्या व्यवसायातील कामाला त्यांचा एक वरदहस्त लाभला आहे अशी माझी धारणा आहे.

**युवतींचा पहिला बरचीगट ..**



मी साहाय्यक युवती सचिव असताना प्रथमच मुलींनी गणेशोत्सवात बरचीगट म्हणून सहभाग घेतला होता. मी मुलींची उदंड तयारी करून घेतली होती. हात बसवणे हे काम माझे होते आणि इतर युवती कार्यकर्त्या वाद्यविभाग सांभाळत होत्या. अजूनही कढईत वाढण्याच्या चमच्याला चिकटलेली भाजी कढईवर आपटून काढताना २-१; २-२-१; २-१ असा ताल धरला जातो, कितीतरी वेळ हा लोहगोल गाजत राहतो, त्यामुळे माझा साधासुधा भाजी भाकरीचा स्वयंपाक देखील साग्रसंगीत होतो.

मुळात मुलींनी बरच्या कराव्यात ही कल्पना माझी नव्हतीच. त्यावेळच्या आठवी-नववीच्या मुलींना तो सोस होता. मुलं बरच्या करतात तर मुलींनी का नाही असाही एक सूर होता. माझ्याकडे ही सूरपट्टी कधीच नव्हती. तेव्हाही नव्हती आणि आजही नाहीये. त्या मुलींचा हट्ट होता म्हणून मी रुकार भरला. आनंदी गाण्याचा आदर्श समोर ठेवून तुडुंब सराव करून घेतला. तेव्हा माझा स्वभाव टोकाला जाण्याचा होता. म्हणजे सगळं काही एका दमात, उत्तम प्रकारे झालंच पाहिजे हा माझा अट्टहास होता, आणि म्हणेन तसे करून दाखवीन अशी रगही. त्यापायी मी मुलींना खूप ताबडवून घ्यायची. शेंडी तुटो वा पारंबी अशा निकराने आमचा सराव चालू होता. मा. अशोकरावांनी मला माझ्या १८व्या वाढदिवसाला एक पत्र लिहिलं होतं, त्यात ते म्हणाले, ''की ताल चुकला तर तुडवून काढीन, असा सज्जड दम भरणारे मैदानी नेतृत्वही तिचंच !'' आज या मुलाखतीत, कधीकाळी माझ्याकडून अजाणता दुखावलेल्या माझ्या छोट्या मैत्रीणींची मी मनापासून क्षमा मागते.

अखेरीस मिरवणुकीत, प्रबोधिनीपासून ते जेमतेम जोंधळे चौकात जाईपर्यंत मुली पूर्ण घामेजलेल्या होत्या. मग तिथे काय करायचं असा प्रश्न पडला. तेव्हा आम्ही आता थांबू का असं विचारलं आणि आम्हाला उत्तर मिळालं, की नाही आता तुम्ही सुरू केलं आहे तर ते पूर्ण करायचं. शेवटी सोपे-सोपे हात करत राहिलो आणि थोड्या वेळात जाणवले की जमतंय की आपल्याला! मला तेव्हा हे माहित नव्हतं की थकव्याचाही एक बहर येतो.

तो क्षण स्त्री शक्ती प्रकटनाचा होता, जगदंबा आमच्या हाकेला धावून आली होती, आमच्या थिरकणाऱ्या पावलातून

ती घुमत होती. मुलींना जमतील असे हात आणि ताल बसवणं आणि घोटवून घेणं हे सगळं खूप धमाल होतं. आता जेव्हा मी कुठलीही मिरवणूक पाहते तेव्हा मन आनंदाने भरून नाचायला लागतं, युवतींचा सहभाग पाहून खूप अभिमान वाटतो. मी मनातल्या मनात ताल द्यायला लागते, ओळी सरळ आहेत की नाही हे तपासायला लागते आणि नसतील तर मी, ओळ मोडणाऱ्यांना, ताल चुकवणाऱ्यांना मनातल्या मनात झापतही राहते.

## युवतींचे पहिले तंबूतले शिबिर

असंच एकदा तंबू शिबिर झालं होतं तेव्हा खूप दारूबंदीचा माहोल होता. युवती विभागाचे हे पहिलेच तंबूतील शिबिर. आम्ही तंबू भाड्याने आणणे, तंबू उभे करणे, चर खणणे इत्यादी कामे प्रयोग करूनच शिकलो. रात्री कोणी हल्ला करेल का या चिंतेत दोन युवती पहारा देत जाग्या राहात असल्याचे आठवते आहे.

त्या शिबिराचे खाते वाटप चालू होते. मला तेव्हा स्वयपांकाचा गंधही नव्हता आणि असंच कुठल्यातरी एका बैठकीत, मी काहीशा उर्मटपणे असं म्हणाले होते की स्वयंपाक खाते मला नको, मला त्यात रस नाही, शिवाय स्वयंपाक काय अर्ध्या रात्रीत शिकून करण्याची गोष्ट आहे. माझी बेपर्वाई जाणवून मग मा. गिरीशरावांनी सांगितलं, की तसं असेल तर उत्तमच, आज रात्रीच स्वयंपाक शिकायला सुरुवात करा, उद्यापर्यंत येऊन जाईल, मग तुम्हीच सांभाळा स्वयंपाक खातं. मला स्वयंपाकातले ओ का ठो येत नव्हतं आणि तोरा तर असा होता की जणू आपण कमलाबाई ओगलेच. अशा प्रकारे त्या शिबिराचं भोजन खातं माझ्याकडे आलं होतं. मी उगाच स्वयंपाकघरात लुडबुड करत होते. जेव्हा ज्योतीताईने आमटीत पाणी घालायला सुरुवात केली आणि मी ओरडले होते की अगं आमटीत पाणी कोण घालतं? मला शंका आली, हिला तरी नक्की येतो का स्वयंपाक. त्या वेळेपर्यंत मला हेच माहित नव्हतं की आमटी करताना पाणी घालतात. अशी एकूण धन्य परिस्थिती होती.

माझ्या वर्गातली चेतना आणि मी शाळेत उस्फूर्त वक्तृया म्हणून अगदी प्रसिद्धच होतो. मी पंजाबच्या दौर्याचे अनुभव फार द्रुतगतीने सांगायचे, तेव्हा माझे झेलम एक्सप्रेस असं नामकरण झालं होतं. पंजाब मध्ये मी, गीता आणि भारती एकदा हरवलो होतो, रामदेव सराई आणि गुरु रामदेव सराई अशी दोन ठिकाणं होती, बाकीचे सगळे रामदेव साराईला गेले आणि आम्ही चुकून गुरु रामदेव साराईला पोचलो होतो. रामदेव साराईला जाण्यासाठी आमच्याकडे पैसेही नव्हते! शेवटी म्हटले इथे शबद किर्तन करायचं, लोकं जे पुढ्यात पैसे टाकतील त्यातले दहा रुपये घ्यायचे आणि मग रिक्षा करून रामदेव साराईला पोचायचं असं ठरवलं होतं. आम्ही रामदेव साराईला पोचल्यावर सर्वांच्या जीवात जीव आला. सुवर्ण मंदिरात आमच्या पहाऱ्याला मारेकरी ठेवण्यात आले, आमच्या गाडीला अपघात झाला, एकूण काय, **तळहाती शीर घेऊनिया दख्खनची सेना लढली.**

## सती आणि गुरखा प्रश्न अभ्यास दौरा ..

राजस्थानात सती प्रश्नाचा आणि पूर्वेकडे गुरखा प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी दोन दौरे झाले. या दोन्हीही ठिकाणी पंजाबसारखेच जीवावर उठणारे अनुभव आले. राजस्थानमध्ये स्त्रियांच्या अत्याचाराने मन पिळवटून गेले तर दार्जिलिंग, सिलिगुडीमध्ये विभाजनाच्या अट्टाहासाने मन सुन्न झाले. या दोन्हीही दौऱ्यातून मोलाचे शिक्षण झाले. पुढे कुठेही समस्यांच्या चक्रीवादळात सापडले, अनिश्चितता बेचैन करू लागली की आठवण होते की याहून कितीतरी कठीण प्रसंगाला आपण तोंड दिले आहे आणि समस्यांवर मात केली आहे. या अर्थाने हे दौरे पुढील आयुष्यात दीपस्तंभ ठरले.

माझ्या नेतृत्वाच्या बाबतीत काही गमतीदार आठवणी आहेत. शिकागोत मी २००८ साली मुलांचं एक तासाचं मराठी नाटक बसवलेलं होतं. मला असं वाटायचं की सगळ्या मुलांना मराठी बोलता आलंच पाहिजे, आणि ही मुलं तर इंग्रजी लहेजा वापरून मराठी बोलायचे. अशावेळी खूप काम करावं लागायचं. तास-तास सराव चालायचा, मग पालक विचारायचे की सरावाला नाही आलं तर चालेल का? आपण dubbing करूयात का? मी साफ नकार दिला आणि मुलांची भाषा, हावभाव घोटवून घेतले. त्यामुळे पालकवृंदात मी फार लोकप्रिय होते असं म्हणता येणार नाही. त्यावेळी नलूताईंनी आमचं आनंदी गाणे कसं बसवलं होतं हे मला आठवत होतं. तासन्तास सराव असायचा, तेव्हा आम्हालाही कंटाळा यायचा, काही वेळा मुली अगदी चक्कर येऊन पडलेल्यासुद्धा मला आठवतंय, पण नलूताई बधल्या नाहीत आणि उत्तम गाणे होईतो सराव करून घेत राहिल्या.

## पदवी आणि वकिली

भविष्यात नक्की काय करायचं हे एव्हाना ठरलेलं नव्हतं. राष्ट्रार्थ भव्य कृती काही पराक्रमाची या निकषावर काही करायचे एवढे मात्र ठरले होते. आपल्या वर्षारंभाच्या पोथीत जे cybernetics बद्दल लिहिलेलं होतं ते मला खूप भावायचं. मी पदवीसाठी मानसशास्त्र हा विषय घेतला होता. तेव्हा मी प्रबोधिनीचं काम करत असल्यामुळे कॉलेजमध्ये कमीत–कमी वेळ घालवता येईल असा विचार करून मी हा निर्णय घेतला होता. माझ्या डोक्यात achievement motivation चं खूळ होतं. माणसांच्या प्रेरणा काय असतात, कशी काम करतात हे जाणून घ्यायची उत्सुकता देखील होती. शिवाय वकिली करायची तर आपल्याला लोकांच्या मनाचा थांगपत्ता लावता आला पाहिजे असा आडाखा देखील होता.

लॉ कॉलेजमध्ये नाव नोंदवून, वकिलीचा अभ्यास बाजूला ठेवून प्रबोधिनीचे काम जोरात चालू होते, तेव्हा जी व्यक्तिमत्त्वाची जडण–घडण झाली होती, त्याच्यामुळे आयुष्य घडलं असं म्हणायला हरकत नाही. शाळेतल्या उत्स्फूर्त वक्तृत्वामध्ये वकील होण्याच्या शक्यतेची झलक दिसली होती. वकिली करायची हे आम्हाला (मला आणि धनंजय कुलकर्णी म्हणजेच योगी महेश्वरानंद जे आता रामकृष्ण मिशनचे संन्यासी आहेत यांना) प्रबोधिनीतून सांगण्यात आलं होतं, की आपल्याकडे चांगले वकील पाहिजेत म्हणून, तुम्ही कायद्याचा अभ्यास करा.

## अमेरिकेत पदव्यूत्तर शिक्षण

भारतात कायद्याची पदवी घेऊन मी अमेरिकेत आले. तेव्हा माझी तिथल्या कायद्याच्या पद्धतीशी, संस्कृतीशी, भाषेशी नाळ जुळली नव्हती. मी तेव्हा काय करायचं, काय करू शकतो याचा विचार करत होते. तेव्हा कुतूहल म्हणून प्रोग्रॅमिंग शिकायला सुरुवात केली. मग आता Pascal शिकलो तर C पण शिकूया, असं करत–करत मला प्रोग्रॅमिंग जमायला लागलं. मला एका ठिकाणी प्रोग्रॅमर म्हणून लहानशी नोकरीही लागली, प्रत्यक्ष काम करता–करता संगणकाची भाषा आवडायला लागली.

तेव्हा intellectual property (IP) कडे वळायचं हे डोक्यात होतच, पण त्यासाठी तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता असते. मग मी त्या दृष्टीने युनिव्हर्सिटी ऑफ ह्यूस्टन ला पदव्यूत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला. सुरुवातीला मला दडपण यायचं, बरोबरची भारतीय विद्यार्थी मंडळी IIT, COEP सारख्या मान्यवर संस्थांमधून शिक्षण घेतलेली होती. मला अगदी बारावीपासून ते इंजीनीअरिंग पर्यंतचे, आधी गणिताचे मग संगणकाचे शिक्षण पूर्ण करावे लागले, तिथे प्रबोधिनीची शिस्त आणि जिद्द खूपच उपयोगी पडली.

ही वाट थोडी अवघड होती खरी, पण आप्पांच्या सांगण्याप्रमाणे काहीतरी पराक्रम करायचा आहे हे डोक्यात होतं. प्रबोधिनीत उत्तम कार्यशैली अंगी बाणवलेली असते. आपल्याला काळ–वेळेची, कष्टांची तमा नसते, काम येत नाही का, शिकून घेऊ; सकाळपासून यायचं का? येऊ की, रविवारी काम करायचं का? करूया ना. अशी सगळं प्रबोधिनीत शिकलेली करूच करू ची तंत्र आपसूक वापरली जात होती. धारणेच्या पातळीवर प्रबोधिनीचा माणूस विलक्षण लवचिक असतो, त्याला कुठेही जोडून दिलं की त्यांच्यामधून चैतन्याचा प्रवाह लगेच चालू होतो. खरतर प्रबोधिनीत सकारात्मकतेचा असा अष्टपैलू अविष्कार बहुधा सगळ्यांनाच जमतो, त्यामुळे प्रबोधिनीत त्याचं वेगळेपण जाणवत नाही, पण प्रबोधिनीच्या बाहेर पडल्यावर मात्र ती सकारात्मता आपली जन्मखूण आहे हे जाणवत राहतं.

## मोटोरोला

माझा M.S. चा प्रबंध नासाच्या कामाशी संलग्न होता, नासाबरोबर काम करता–करता एकीकडे Ph.D करायचं हे ठरलं होतं. पदवी मिळण्याअगोदरच सहा महिने नासाची ऑफर माझ्या हातात होती. माझ्या मैत्रिणीला मात्र नोकरी मिळत नव्हती, म्हणून मी तिला घेऊन एका job fair ला गेले होते. त्यांनी मला सांगितलं, की त्या मैत्रीणीबरोबर तुलाही नोकरीसाठी मुलाखत द्यावी लागेल. मुलाखतीत त्यांनी मला विचारलं की नासा सोडून मोटोरोलामध्ये जॉईन होण्यासाठी तू काय घेशील? मी त्वरित म्हणाले की तुम्ही माझ्या कायद्याच्या शिक्षणाचा आर्थिक भार उचला आणि मी नासा सोडून तुमच्याकडे जॉईन होते. ते चक्क माझ्या प्रस्तावाला तथास्तु म्हणाले आणि मी मोटोरोलामध्ये नोकरी सुरू केली. त्यांचा विचार बदलण्याच्या आत मी लगबगीने माझ्या अमेरिकेतील कायद्याच्या अभ्यासाला सुरुवात केली.

मी मोटोरोलामध्ये टेक्निकल सपोर्ट मध्ये काम करत होते. खूप मोठं जोखमीचं काम होतं ते, तिथे तुम्हाला सर्व यंत्रणा नीटच माहिती असावी लागते. अंदाजपंचे तुम्हाला तिथे काहीच खेळता येत नाही. जरी मी तिथे रमले तरी मनात मला

अमेरिकेतील कायद्याची पदवी पण मिळवायची होती. मला इथे भारतातल्या पदवीच्या जोरावर बार काऊन्सिलची परीक्षा देऊन अमेरिकन सनद मिळवणे सहज शक्य होतं, पण जाणीवपूर्वक मी तसं केलं नाही. कारण मला पुढे कोणी कुठून पदवी घेतली आहे कोण जाणे असा प्रश्न विचारायला नको होता.

पाच वर्षं मी दिवसा पूर्ण वेळ नोकरी करून रात्रीच्या वर्गात नाव नोंदवून कायद्याच्या पदवीचे शिक्षण पूर्ण केलं. तेव्हाचा माझा दिवस म्हणजे सकाळी ६ वाजता मोटोरोलाचं काम सुरू व्हायचं ते दुपारी ३ ला संपायचं. मग मी तीस मैल दूर असलेल्या कॉलेजमध्ये जायचे, तिथे ६ ते ९ क्लासेस असायचे. तिथून घरी येऊन स्वयंपाक, गृहपाठ करेपर्यंत दोन व्हायचे आणि पुन्हा सकाळी ६ ला कामाला जायचं असायचं. असा चार तास झोपेवरती जवळपास चार-पाच वर्षं हा कसोटी सामना चालू होता.

कै. मरि मोनहन नावाच्या, माझ्या कायद्याच्या एक प्राध्यापिका होत्या. तेव्हा पूर्णवेळ नोकरी होती, घरी लहान मूल होतं, त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष व्हायचं, परिणामतः परीक्षेत साधारण श्रेणी मिळत असे. वर्गातील माझ्या सहभागातून बाईंच्या माझ्याकडून असलेल्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्यांनी मला त्यांच्या ऑफिसमध्ये बोलवून घेऊन सांगितलं, की वाट्टेल ते कर, पण मला तुझ्याकडून फक्त उत्तम श्रेणीच हवी आहे, तेव्हा त्या बाई अगदी नलूताईंसारख्या भासल्या. त्यांचे बोलणे माझ्या मनाला खरोखर भिडलं आणि आकाशपाताळ एक करून मी त्यानंतर प्रत्येक वर्गात उत्तम श्रेणी मिळवली.

लॉ कॉलेजमध्ये असताना माझा सकाळी ६ ते रात्री ११ असा भरगच्च दिवस असायचा. एकदा मी रात्री कॉलेज मधून घरी येत असताना खूप पेंगूळले होते आणि चुकून आधीच्या स्टेशनवरच उतरले. पुन्हा चढण्याची सोय तिथे नसल्यामुळे मला तिथेच थांबावं लागलं. तेव्हा स्टेशनवर एक उंचापुरा काळा माणूस माझ्याकडे चालत यायला लागला. आपला स्वभाव कसा असतो ना, माझ्या मनाची पक्की खात्री पटली की हा आपल्याला त्रासच द्यायला येतोय. तेव्हा मी सगळं आठवलं, पानं उलटली, गुरखा प्रश्न अभ्यास दौऱ्यात स्वतःला कसं वाचवायचं याचा धडा उलटला आणि आपली जड बॅग उचलून त्याच्या डोक्यात घालायची आणि पळत सुटायचं यासाठी तयार राहिले. तिथे स्टेशनवर उष्णता देणारे दिवे असतात. तो माणूस माझ्यापर्यंत आला, त्याने पाहिलं की मला थंडी वाजत होती, त्याने तो दिवा लावला आणि तो निघून गेला. त्याला मला काहीही करायचं नव्हतं. इथल्या माणुसकीचा मला एक प्रत्यय आला. तेव्हा मला लक्षात आलं की आपण किती पूर्वग्रह घेऊन बसलेलो असतो. त्याला शक्य होतं मला लुबाडण, मी लहानही होते आणि माझ्याकडे पैसेही पुरेसे होते पण त्याने तसं केलं नाही. या माणुसकीनं माझ्या मनात घर केलं.

## वकिली

या देशात वकिली करणं खूप अवघड असतं, कारण ग्राहक मिळवणे हा या व्यवसायाचा गाभा आहे. कसे मिळवणार ग्राहक? ना इथे तुमचा पिढीजात वकिलीचा व्यवसाय, ना तुम्ही दारू पीत पार्ट्या करत फिरता, मग तुम्हाला ग्राहक मिळणार तरी कसे? हा प्रश्न प्रत्येक वकिलांपुढे कायम असतो. त्यामुळे तुमचं माणसं गुंफण्याचं कौशल्य पणाला लावाव लागतं. कर्मचारी वर्गासोबत चांगलं वागावं लागतं, अखेर त्यांच्यावर तुमची मदार असते. प्रबोधिनीत आप्पांनी हे सगळं निगुतीनं शिकवलेलं आहे.

आप्पा गोपाळरावांशी कसे वागायचे, ताराबाईंशी कसे वागायचे, त्यांच्या साहाय्यकांशी कसे वागायचे हे आम्ही पाहिलेलं होतं. प्रबोधिनीत आपण खूप काही शिकतो. त्यामुळे हेच सगळं शिकलेलं ज्ञान मी वापरात ठेवते, लक्षात ठेवते, त्याचा प्रचारही करते. जरी मी अनेक वर्षं अमेरिकेत राहत असले तरी माझी नाळ ही घट्ट प्रबोधिनीशी जोडली गेलेली आहे. इतकी श्रीमंती प्रबोधिनीने दिलेली आहे, की मी म्हणजे शून्य आहे आणि प्रबोधिनी म्हणजे एक आहे, आणि त्या एकावर अशी अनेक शून्यं आहेत. जितकी शून्य जास्त तितका संघटनेचा पाय भक्कम असं म्हणता येईल.

अमेरिकेत आलेल्या वकिलीच्या अनुभावांबद्दल बोलायचं झालं तर आप्पांनी शिकवलेली तत्त्वं डोक्यात अगदी पक्की बसली होती. नाहीचं हो करून घ्यायला शिकणं असेल, पाठपुरावा करायला शिकणं असेल, उत्तमता असेल, किंवा influencing the influential असेल, सगळी तंत्रं मी अनेकवेळा वापरली आहेत. कदाचित खोटं वाटेल पण आजही मी तीन-तीन दिवस बसून फक्त पाचच ओळी लिहिते. तितकी तितिक्षा तुमच्याकडे असायला लागते, तितका दमदारपणा असावा लागतो. हे शाळेने दिलं आहे. तडजोड करायची नाही, हे जीवनमूल्य दिलेलं आहे, म्हणेन ते करून दाखवेन हा आत्मविश्वास दिलेला आहे.

भारतातील न्याय व्यवस्थेबाबत विचार करताना जाणवतं, की Uniform Civil Code हे केवळ मार्गदर्शक तत्त्व न राहता त्याचे कायद्यात रूपांतर व्हावे असे वाटते. वेगवेगळ्या धर्माच्या लोकांना वेगवेगळे कायदे असल्यामुळे भारतीय

न्यायव्यवस्था एकसंध असण्यात अडथळे निर्माण होतात असे मला वाटते. अमेरिकेतल्या लोकांचा, कायदा तोडण्यापेक्षा तो पाळण्याकडे जास्त भर असतो हे जाणवलं. एकूणच जगात लोकांना कायद्याचा बडगा वाटतो. शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये असं म्हणलं जातं. हे बदलायला हवे. अमेरिकेत व भारतात, तसं बघायला गेलं तर, अन्याय हा सारखाच आहे. भारतात दलितांवर होतो आणि इथे कृष्णवर्णीयांवर. अमेरिकेतली कायदा व्यवस्था ही खूप महाग असल्याने ती सर्वसामान्यांना परवडत नाही. Legal Activism मध्ये कायदे पंडितांनी भाग घ्यायला हवा असं मला वाटतं. भारतात trial by Jury असायला हवा असं मला वाटतं, त्याच्यामुळे थोडा निकालातील सापेक्षपणा निघून जायला मदत होऊ शकते.

**स्त्री–शक्ती जागरण**

स्त्री म्हणून वकिलीच्या क्षेत्रात माझ्या वाट्याला बराचसा चढणीचा घाटच आला. एकतर अभियांत्रिकीत मुली कमी, त्यातून लग्न झालेल्या मुली कमी, त्यातून उद्देशी कमी, त्यातून पेटंटची वाट निवडणाऱ्या अशा मोजक्याच आणि विरळाच. त्यामुळे बऱ्याचदा अपयश आलं, रक्तबंबाळ व्हायला झालं पण प्रबोधिनीचे तहानलाडू–भूकलाडू कामी आले. चांगल्या अर्थाने आपण काम करत मोकळे होत असतो. जेव्हा यश मिळालं नाही तेव्हा त्याचं फार काही दु:ख झालं नाही आणि जेव्हा मिळालं तेव्हा ते काही फार डोक्यात गेलं नाही. तेव्हा जसं डोक्यात होतं की आपल्याला वकिलीच्या क्षेत्रात यशस्वी व्हायचे आहे, तसं आजही डोक्यात हे आहे की माझ्या थोड्याफार यशाचा हा मानाचा तुरा हा प्रबोधिनीच्या मुकुटात खोवला जावा. स्त्री म्हणूनही काही वेगळी आव्हानं नेतृत्वाच्या पद्धतीत अनुभवायला मिळाली. स्त्रियांच्या बाबत साधारणपणे अपेक्षा असते की त्यांनी सर्वांशी आणि परिस्थितीशी जमवून घ्यावं. सहसा प्रबोधिनीची लोकं जाम जिद्दी असतात, पण काहीवेळा बाहेरच्या जगात बायकांनी फार महत्त्वाकांक्षी असू नये असा एक दृष्टीकोन असतो. पुरुषप्रधान विचारांचे लोक कधी–कधी व्यवसायाच्या ठिकाणी स्त्रियांच्या कामाचे श्रेय लाटतात आणि त्यांना मागे कष्टाचे ढीग उपसायला ठेऊ बघतात. स्त्रियांचे यश त्यांना आवडत नाही. काम यशस्वी करण्याची अक्कल, समज आणि धमक असलेल्या स्त्रियांना त्यांचे हे उद्योग समाजात नाहीत अशा भ्रामक समजुतीत ते वावरत असतात.

स्त्री असल्याचे अनेक फायदेदेखील आहेत. प्रत्येक स्त्रीला हे माहित असतं, की घर कसं आवरतात, मुलांना कामाला कसं लावतात, एका वेळी अनेक कामे कशी निपटायची असतात. त्यामुळे स्त्रियांना अनेक दरडींवर हात ठेऊन भरपूर काम करता येतं आणि सगळ्या कोत्या विचारसरणीच्या लोकांना मागे टाकता येतं. आपल्या कौशल्याबरोबरच आपलं श्रेयाचे नाणं खणखणीत वाजवण्यासाठी मात्र भरपूर परिश्रम करावे लागतात, त्यात तुम्ही हयगय करून चालत नाही.

इथे पुरुषप्रधान संस्कृती आहे, गोऱ्या लोकांना प्राधान्य मिळणारी संस्कृती आहे. बहुतांश इतर क्षेत्रांप्रमाणे इथेही, गोरे पुरुष व्यावसायिक क्षेत्रात मक्तेदारीचे वेटोळे घालून बसलेले असतात. त्यामुळे भरपूर काम करावं लागतं, अथक श्रम करावे लागतात. तसेच तुमचे विचार, तुमची मतं खूप नेमकी आणि स्पष्ट असावी लागतात. गमतीचा भाग म्हणजे, माझ्या इथल्या सहकाऱ्यांना मी काहीतरी खास शिक्षण घेऊन आले आहे, असं वाटतं, जे की खरतर प्रबोधिनीने दिलेलं माणूस घडणीचे शिक्षण आहे.

**स्त्रियांनी अपरिहार्य कारण असल्याशिवाय सवलती मागू नयेत असे मला वाटते. जर आपल्याला समानता हवी असेल तर ती आपण सगळ्या स्तरांवर निभावयाला हवी. कदाचित जेव्हा मुलं लहान असतात तेव्हा तडजोड करावी लागते त्यावेळी समन्वय साधायचा प्रयत्न करावा. समानतेकडे जाणारा माझा प्रवास अजूनही चालूच आहे. विशेषत: स्त्रियांना स्वत:च्या अधिकार क्षेत्रात आपला स्वत:चा आवाज शोधावा लागतो आणि प्रसंगी डरकाळी देखील फोडावी लागते, तीही अगदी खालच्या स्वरात.** मी उपद्रव देणाऱ्या सर्वांना खूप शांतपणे आणि नम्रपणे सांगते, की इथे माझी सही झाल्याशिवाय तुला पैसे मिळणार नाहीयेत, त्यामुळे माझ्या गुणवत्तेच्या निकषानुसार तुला काम करून द्यावंच लागणार आहे. स्त्रिया बरेचदा कारण नसताना आणि मुख्य म्हणजे त्यांची चूक नसताना सॉरी म्हणतात, अनेकवेळा पटकन शब्द मागे घेतात, कारण घरी आईने तेच केलेलं असतं, सगळ्यांना सामावून घेण्यासाठी. घरकाम आणि व्यवसाय यात समन्वय साधताना मग मला हे स्वत:ला शिकवावं लागलं की २० मिनिटात होतील तेवढीच घरातली काम करायची. मी जर सगळं काम करत बसले तर बाराच वाजतील. हे सगळे संघर्ष अजूनही चालू आहे.

मला यापुढे स्त्रियांच्या घडणीसाठी, मजबूतीसाठी, सशक्तीकरणासाठी काही काम करायला आवडेल. भारत आणि अमेरिकेच्या सुप्रिम कोर्टाच्या कामकाजाबद्दल आणखी समजून घ्यायला आवडेल. कायम निमूटपणे काम करणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या हक्काची आणि कर्तृत्वाची जाणीव करून द्यायला आवडेल.

रूप पालटू देशाचे असं म्हणत असताना युवती आणि महिला यांच्यासाठी आणखी खूप काम व्हायला पाहिजे असं वाटतं, आणि त्यासाठी मी प्रयत्नशील राहते. कारण कुठल्याही क्षेत्रामध्ये पाय रोवण्यासाठी पुरुषांपेक्षा कित्येक पटीने जास्त त्रास हा बायकांना सहन करावा लागतो. मी माझ्या परीने जेव्हा-जेव्हा तरुण किंवा लहान मुलींना भेटते, तेव्हा त्यांच्या हातात एक जादूची कांडी द्यायचा प्रयत्न करते, की तुम्ही झाशीच्या राणीच्या मुली आहात, तुम्हाला हे सगळं जमणार आहे आणि तू कांकणभर जास्त सरस आहेस. आयुष्याच्या या वळणावर महिला सक्षमीकरण या क्षेत्रात आणखी काम करायला हवं असं वाटत राहतं.

सामाजिक कामामध्ये सातत्य लागतं, उपलब्धता लागते, लोकांना पटवण्याचं कौशल्य लागतं, गेली अनेक वर्षं मी ही कौशल्यं मिळवण्याचा प्रयत्न करते आहे. आता JPF च्या निमित्ताने पुन्हा या सगळ्या लोकांची भेट होते आणि बरं वाटतं. मला नक्की भारताचं किती रूप पालटता येईल हे माहित नाही पण या सगळ्या प्रबोधिनीच्या नव्या पिढीला बळ देण्याचं काम, त्यांना आधार देण्याचं काम, अनुभवाच्या शिदोरीची अंगत-पंगत घालण्याचे काम मला करायला आवडेल.

**ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन JPF : अमेरिका**

सध्या मी सुवर्णाताईंनी केलेलं बचत गटाचं काम गोष्टीरूपाने लेखन करून त्यायावर आधारित podcast बनविण्याचे काम करत आहे. या कामात मी मुख्यतः लेखनाचे काम करते आहे. तसेच ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या मार्फत अमेरिकेमध्ये बाल प्रबोधिनीमध्ये मुलांना शिकवायचं काम करते. त्यांच्याला अनुसरून मुलांच्यासाठी कविता लिहायच्या, त्यांना बोली भाषा, वाक्प्रचार शिकवायचे असे माझ्या कामाचे स्वरूप आहे. तसेच अमेरिकेत युवती विभाग सुरू करण्यासाठी १९८६ च्या तुकडीची विद्यार्थिनी चित्रा केळकर-भावे हिला मदत करते आहे.

मी, अपर्णा आणि विशाखा या माझ्या वर्गमैत्रिणींनी मिळून, वेल्ह्याच्या वसतिगृहातल्या मुलींसाठी एका पुस्तकाचा अनुवाद केला आहे. मला त्या सगळ्या मुलींना भेटायला, त्यांच्याशी बोलायला खूप मजा आली होती.

प्रबोधिनीत आपल्यासारखे लोक कायम भेटतात. त्याला वयाचं बंधन कधीच येत नाही. object oriented भाषेत बोलायचं झालं तर आपण एकाच object चे instances असतो. त्यामुळे तो कुठूनही pickup करता येतो, कुठूनही जुळवून घेता येतो. म्हणजे अगदी नवीन ओळख झाली तरी दोन माणसं अगदी सहज जोडली जाऊ शकतात. तो जो आपल्याला एकत्र जोडणारा गाभा आहे, तो मला विलक्षण भावतो. जिद्द प्रबोधिनीच्या रक्तात असते, तसेच सगळ्यांचे स्वभाव एकसारखेच हटवादी असतात, पण त्याच वेळी एकमेकांशी जुळवून घेणारेही असतात असं काहीतरी विलक्षण रसायन असतं. प्रबोधिनीच्या बाहेरच्या लोकांना आपण जे काही करतो त्याचं खूप कौतुक वाटतं. पण प्रबोधिनीत मात्र कोणीही काही फार केलं तरीही आपल्याला त्याचं अप्रूप नसतं. आपल्याकडे M.Sc. झालेल्यांना इतिहास शिकवायला सांगतात आणि वकिलाला प्रोग्रॅमिंग, असं काहीही होतं इथे.





## CAT

सध्या मी Caterpillar मध्ये Patent Attorney म्हणून त्यांच्या डिजिटल portfolio चे काम बघते. जगभर सॉफ्टवेअर पेटंट्स मिळवणे, मिळालेल्या पेटंट्सचे हक्क बजावणे माझ्या कामाचा मुख्य भाग आहे. स्वतःमध्ये गेल्या पस्तीस वर्षांत काय बदल झाला असा विचार करताना जाणवते, की मी बरेचदा खूप टोकाची भूमिका घेणारी होते. शेंडी तुटो की पारंबी असा स्वभाव होता, तो आता बराचसा निवळला आहे. जसं जग बघत गेले तसं शिक्षण होत गेलं आणि कळलं की कधी-कधी आपल्यापेक्षा मठ्ठ माणसं आपल्यापेक्षा वरच्या पदावर काम करत असतात आणि समझोता म्हणून त्यांचं ऐकायचं असतं हे समजत गेलं. प्रबोधिनीत हे कधीच होत नाही. बैठकीच्या आधी बैठक घेऊन दिशा ठरवणे, डावपेच, छक्केपंजे हे अमेरिकेत आल्यावर शिकावं लागलं. व्यवहारीपणा नव्हता तो इथे अनुभवाने शिकावा लागला.

### मागे वळून पाहताना

**सुरुवातीला प्रबोधिनी हा समाजाच्या दृष्टीने एक नवा प्रयोग होता, त्यांनंतरचं एक विस्तारपर्व होतं, आपले कार्यकर्ते वेगवेगळ्या राज्यात जात होते. आता ह्या नवीन विस्तारपर्वात, हे सगळं आंतरराष्ट्रीय स्तरावर चालू आहे असं जेव्हा मी बघते तेव्हा आप्पा किती द्रष्टे होते याचा अंदाज येतो.**

**आप्पा काही अगदी पहिल्यापासूनच परिपूर्ण होते असं नव्हतं. पहिल्यांदा जेव्हा युवती कार्यकर्त्या प्रबोधिनीत आल्या होत्या तेव्हा त्यांनी परांडे वाडा धुवून काढला होता. असे ते ब्रह्मचारी आणि कठोर व्रत पालन करणारे होते. पण त्यानंतर लताताईंच्या आजारपणात आप्पांनी त्यांची खूप सेवा केली. आमच्या सगळ्यांवरच पोटच्या पोरांपेक्षा जास्तच प्रेम त्यांनी केलं होतं. तसं बघायला गेलं तर मला तीनच वर्षांचा त्यांचा सहवास मिळाला पण त्यातही मला असं वाटतं की आप्पा हे एक व्यक्ती नव्हते, ते एक fantastic phenomenon होते. तुम्हाला ते जेवढे फोटोत दिसतात त्यापेक्षा कैक पटीने दिसायला तेजस्वी होते. Software च्या भाषेत सांगायचं तर अशक्य ते शक्य करणारा असा एक लळीं असतो, आप्पांचा तो bit flip झाला होता. आता जेव्हा मी असा विचार करते की, हे सगळं जग हा अंधार आहे आणि प्रबोधिनीच्या माणसांच्या आतला जो प्रकाश आहे, त्या प्रकाशाचे, जिथे-जिथे प्रबोधिनीची माणसं आहेत तिथे-तिथे असे अनेक तेजःपुंज ठिपके जगभर पसरलेले आहेत, आणि ते या जगाला तारून नेणार आहेत.**

**आप्पा was not a great person who was born great. त्यांनी त्यांच्या प्रवासातून परब्रह्म शक्तीच्या स्फुरणाचे प्रात्यक्षिक करून दाखवलं. मला त्यांचा हा संपूर्ण प्रवास खूप सहज आणि शक्यतेच्या कोटीतला वाटतो. बरेचदा असं होतं की प्रबोधिनीचे विद्यार्थी हुशार असतात आणि त्यांच्यासमोर इतक्या वाटा खुल्या असतात. मग त्यांच्या मनात हा प्रश्न येऊ शकतो, की काय निवडायचे? प्रबोधिनी की दुसरं काही. त्यांना मला हे जरूर सांगायला आवडेल, की या कामाचा रंगच इतका सुंदर आहे, हे अस्सल केशर आहे, तुमचेच हात याने रंगून जातात. हे की ते असं निवडण्याची वेळ तुमच्यावर येणार नाही, पण यदाकदाचित तुमची प्रबोधिनीची कास जर सुटली तर मजा येत नाही. तुमच्यात जे तेज असतं, पुरुषार्थ असतो तो सगळा प्रबोधिनीचा असतो. हे सगळं तुमच्यात इतकं मुरलेलं असतं की प्रबोधिनी तुमच्यातून काढून टाकायचा विचारही तुम्ही करू शकत नाही.**

माझं आजही असंच म्हणणं आहे की हे जे काही माझ्या आयुष्यात आहे ते फक्त प्रबोधिनीमुळे आहे. तिथे जी मी शिकले त्यासाठी प्रबोधिनीचे माझ्यावर खूप उपकार आहेत. माझे पेटंट लॉचे काम बुद्धिमतां वरिष्ठम् असेच आहे. सगळ्यात जे बुद्धिमान लोक आहेत, जे संशोधक लोक आहेत, त्यांच्या संशोधनाच्या निमित्ताने त्यांच्याशी माझा रोजचा संबंध येतो. त्यांचे संशोधन शब्दात गुंफून, पेटंटच्या तिजोरीत सुरक्षित ठेवणारे आम्ही अक्षर-जवाहिर आहोत. कधीकाळी श्रीरामदूताचा आप्पांनी मला दिलेला हा आशीर्वाद आज सुफळ संपूर्ण होतो आहे असं पुन्हा-पुन्हा वाटत राहतं.

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट - bellican bails
२. आवडतं पुस्तक - नाच गं घुमा
३. आवडता वकील - मी स्वतः
४. आवडता शिक्षक- सुहासिनीताई देशपांडे, अशोकराव निरफराके आणि आप्पा
५. मानसशास्त्र की कायदा - कायदा
६. शिकागो की पुणे - पुणे
७. एक आवडतं ठिकाण - अमेरिकेत - सुप्रीम कोर्ट
भारतात - प्रबोधिनी
८. पहिली प्रतिक्रिया
- संगणक - analytic
- स्त्री - कर्तृत्ववान
- पुणे - माझं गाव
- न्यायव्यवस्था - कुबड्या आहेत अजून त्या काढायला हव्यात
- ज्ञान प्रबोधिनी - माझं श्रेयस

९. जर पुन्हा नव्याने आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल / कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल? (आत्ताच्या क्षेत्रा व्यतिरिक्त)
- जर पुन्हा एकदा आयुष्य जगायची संधी मिळाली तर वकील सोडून पूर्णवेळ प्रबोधिनीची कार्यकर्ती व्हायला आवडेल.

**सुचेत भगत-चिटगोपेकर**
**suchetabhagat@gmail.com**

**मुलाखत - ईशा कान्हेरे, चिन्मयी खरे**  **शब्दांकन - चिन्मयी खरे**
**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**
**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**
Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org